28 FEB 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ग्रंथदिंडीतून 'मराठी'चा जागर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : मराठी भाषा गौरव दिनाचा उत्साह शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांमध्ये आज सकाळपासूनच ओसंडून वाहत होता. मराठी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथदिंडीतून मराठीचा जागर केला.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपासून वि. स. खांडेकर भाषा भवनापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारतीय संविधान, श्री ज्ञानेश्वरी, श्री नामदेव गाथा, तुकारामबुवांच्या गाथेचे निरुपण हे ग्रंथ ठेवण्यात आले होते.

पालखी पूजनानंतर विद्यापीठ प्रांगणातून 'ज्ञानबा-तुकाराम'च्या गजरात दिंडी काढण्यात आली. हुपरीच्या संत बाळूमामा भजनी मंडळाचे लिंगाप्पा मुधाळे, चंद्रकांत ऐनापुरे, भीमराव जाधव, काकासो हांडे, धोंडिराम मुधाळे, दिग्विजय खोत, संजय लवटे, दीपक मदने, विजय गोरे, जयसिंग घोरपडे, विनायक मानकापूर, सौरभ मधाळे, विजय लोकरे आदींनी दिंडीमध्ये मोठी रंगत आणली.

दरम्यान, मराठी अधिविभागात कवी कुसुमाग्रज व्याख्यानमालेत 'कवी कुसुमाग्रज यांची कविता' या विषयावर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीमध्ये सहभागी झालेले कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. राजेंद्र दास, महादेव देशमुख, नंदकुमार मोरे आदी.

प्रा. राजेंद्र दास यांनी विचार मांडले. ते म्हणाले, 'कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी आहे. त्यांच्या कवितेने मराठी कवितेत एका युगाची निर्मिती केली. त्यांची कविता वर्धिष्णु स्वरूपाची आहे. भव्य, दिव्य आणि मंगलतेची पूजा करणारा कवी म्हणून कुसुमाग्रज मराठी काव्यविश्वाला परिचित आहेत. कुसुमाग्रजांनी मराठी कवितेला मोलाचे योगदान दिले आहे. मराठी मनाची स्पंदने त्यांनी आपल्या कवितेतून मांडली.'

मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, अक्षय सरवदे, दीपक भादले, संत बाळूमामा भजन मंडळाचे (हुपरी) वारकरी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या. अमोल देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 FEB 2025

लोकमत



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ग्रंथदिंडीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. राजेंद्र दास, महादेव देशमुख सहभागी झाले.

# कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी : प्रा. राजेंद्र दास

## विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनाचा उत्साह

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी आहे, असे प्रतिपादन प्रा. राजेंद्र दास यांनी केले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागात गुरुवारी आयोजित कवी कुसुमाग्रज व्याख्यानमालेत 'कवी कुसुमाग्रज यांची कविता' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

### ग्रंथदिंडीचा उत्साह

मराठी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीपासून वि. स. खांडेकर भाषा भवनापर्यंत ग्रंथदिंडीचे आयोजन केले. पालखीत भारतीय संविधान, श्री ज्ञानेश्वरी, श्री नामदेव गाथा, तुकारामबुवांच्या गाथेचे निरुपण हे ग्रंथ ठेवण्यात आले होते. हुपरीच्या संत बाळूमामा भजनी मंडळाने दिंडीत मोठी रंगत आणली.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक, अमोल देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय, तर प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

28 FEB 2025

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात मायमराठीचा गुणगौरव



ग्रंथदिंडीमध्ये सहभागी झालेले कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा. राजेंद्र दास, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नंदकुमार मोरे आदी.



सरस्वती हायस्कूलमध्ये '... बोलतो मराठी'चा सामुदायिक गजर करण्यात आला.

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात शुक्रवारी मायमराठीचा गुणगौरव करणारे विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागात आयोजित 'कवी कुसुमाग्रज यांची कविता' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. राजेंद्र दास यांनी मांडणी केली. कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी काढलेल्या ग्रंथदिंडीत भारतीय संविधान, श्री ज्ञानेश्वरी, श्री नामदेव गाथा, तुकारामबोवांच्या गाथेचे निरुपण हे ग्रंथ ठेवण्यात आले होते.

### मराठीचे चिंतन

कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त कोल्हापुरातील सावली सोशल सर्कलच्यावतीने ह्य अभिजात दर्जा तर मिळाला पुढे काय? या विषयावर झालेल्या परिसंवादात समीक्षक, प्रा. रणधीर शिंदे, नाटककार, नाट्यकर्मी विद्यासागर अध्यापक, प्रकाशक अखिल मेहता, लेखिका सोनाली नवांगूळ यांनी भाग घेत भाषाविषयक चिंतन केले. संयोजक किशोर देशपांडे यांनी स्वागत केले.

### कुसुमाग्रजांच्या आठवणी

इचलकरंजीतील आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयात मराठी विभाग आयोजित व्याख्यानात एकता जाधव यांनी 'अभिजात मराठी आणि कुसुमाग्रज' या विषयावर आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब दुधाळे होते.

### लाभले आम्हास भाग्य !

इचलकरंजीतील सरस्वती हायस्कूल येथे हजारावर विद्यार्थ्यांनी लाभले आम्हास भाग्य, जय जय महाराष्ट्र माझासह मराठी भाषेचा सन्मान करणारी गाणी जितेंद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली जोशपूर्ण सादर केली. संस्थाध्यक्ष अमरसिंह माने, मुख्याध्यापक संजय रेंदाळे उपस्थित होते.

# कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी

कोल्हापूर : प्रतिनिधी

कुसुमाग्रज यांच्या कवितेने मराठी कवितेत एका युगाची निर्मिती केली. त्यांची कविता शाश्वत सत्य मांडणारी आहे, असे प्रतिपादन प्रा. राजेंद्र दास यांनी केले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागात आयोजित कवी कुसुमाग्रज व्याख्यानमालेत 'कवी कुसुमाग्रज यांची कविता' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

प्रा. दास म्हणाले, कुसुमाग्रजांची कविता वर्धिष्णू स्वरूपाची आहे. भव्य, दिव्य आणि मंगलतेची पूजा करणारा कवी म्हणून कुसुमाग्रज मराठी काव्यविश्वाला परिचित आहेत.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. अमोल देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमाला इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. दीपक भादले, तसेच संत बाळूमामा भजन मंडळाचे (हुपरी) वारकरी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



कोल्हापूर : ग्रंथदिंडीमध्ये सहभागी झालेले कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा. राजेंद्र दास, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नंदकुमार मोरे आदी.

## ग्रंथदिंडीचा उत्साह

मराठी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीपासून वि.स. खांडेकर भाषा भवनापर्यंत ग्रंथदिंडी काढली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. हुपरीच्या संत बाळूमामा भजनी मंडळाचे लिंगाप्पा मुधाळे, चंद्रकांत ऐनापुरे, भीमराव जाधव, काकासोा हांडे, धोंडिराम मुधाळे, दिग्विजय खोत, संजय लवटे, दीपक मर्दाने, विजय गोरे, जयसिंग घोरपडे, विनायक मानकापूर, सौरभ मधाळे, विजय लोकरे आदींनी दिंडीमध्ये मोठी रंगत आणली.

28 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी: प्रा. राजेंद्र दास

## शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनाचा उत्साह

कोल्हापूर : कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी आहे, असे प्रतिपादन प्रा. राजेंद्र दास यांनी आज केले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागात आयोजित कवी कुसुमाग्रज व्याख्यानमालेत 'कवी कुसुमाग्रज यांची कविता' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

प्रा. दास म्हणाले की, कुसुमाग्रज यांच्या कवितेने मराठी कवितेत एका युगाची निर्मिती केली. त्यांची कविता वर्धिष्णु स्वरूपाची आहे. भव्य, दिव्य आणि मंगलतेची पूजा करणारा कवी म्हणून कुसुमाग्रज मराठी काव्यविश्वाला परिचित आहेत. कुसुमाग्रजांनी मराठी कवितेला मोलाचे योगदान दिले आहे.



शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीमध्ये सहभागी झालेले कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा. राजेंद्र दास, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नंदकुमार मोरे आदी

मराठी मनाची स्पंदने त्यांनी आपल्या कवितेतून मांडली. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. अमोल देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमाला इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. दीपक भादले तसेच संत बाळूमामा भजन मंडळाचे (हुपरी) वारकरी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्रंथदिंडीचा उत्साह

मराठी भाषा गौरव दिनाचा उत्साह शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांमध्ये सकाळपासूनच ओसंडून वाहात होता. मराठी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीपासून वि.स. खांडेकर भाषा भवनापर्यंत ग्रंथदिंडीचे आयोजन केले. मुख्य इमारतीसमोर कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारतीय संविधान, श्री ज्ञानेश्वरी, श्री नामदेव गाथा, तुकारामबोवांच्या गाथेचे निरुपण हे ग्रंथ ठेवण्यात आले होते. पालखीपूजनानंतर विद्यापीठ प्रांगणातून 'ज्ञानबा-तुकाराम'च्या गजरात दिंडी काढण्यात आली. हुपरीच्या संत बाळूमामा भजनी मंडळाचे लिंगाप्पा मुधाळे, चंद्रकांत ऐनापुरे, भीमराव जाधव, काकासो हांडे, धोंडीराम मुधाळे, दिग्विजय खोत, संजय लवटे, दीपक मर्दाने, विजय गोरे, जयसिंग घोरपडे, विनायक मानकापूर, सौरभ मधाळे, विजय लोकरे आदींनी दिंडीमध्ये मोठी रंगत आणली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 FEB 2025
लोकमत

# ‘स्पार्क’मुळे विद्यार्थ्यांत सर्जनशील जाणिवा : शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेच्या वाटा जाणतेपणाने चोखाळाव्यात, यासाठी स्पार्क चित्रपट महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमांतर्गत आजपासून दोनदिवसीय स्पार्क चित्रपट महोत्सवाला प्रारंभ झाला. यावेळी ते बोलत होते.

उद्घाटन सत्रात ‘मेटाफोर’ या लघुपटाचे सादरीकरण केले. यावेळी समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सह-समन्वयक अनूप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील, माहिती अधिकारी वृषाली पाटील, दिग्दर्शक संजय दैव, रोहित कांबळे, राजेंद्र मोरे, मेधप्रणव पोवार, नितेश परुळेकर, स्वप्निल पाटील, अनिल वेल्हाळ, जयसिंग चव्हाण, चंद्रशेखर गुरव, विशाल कुलकर्णी, प्रशांत भिलवडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 FEB 2025

सकाळ

# विद्यार्थ्यांच्या लघुपटाने 'स्पार्क' महोत्सवाला प्रारंभ

कोल्हापूर, ता. २७ : बी. ए. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'मेटाफोर' या लघुपटाचे सादरीकरणाने आज शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय स्पार्क चित्रपट महोत्सवाला प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन झाले. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेच्या वाटा जाणतेपणाने चोखाळाव्यात, यासाठी स्पार्क महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमांतर्गत आयोजित या महोत्सवामध्ये कोल्हापुरात निर्माण होऊन विविध राष्ट्रीय पुरस्कारांवर मोहोर उमटविणाऱ्या लघुपट, माहितीपटांचा समावेश करण्यात आला आहे. यानिमित्ताने या चित्रपटकर्त्यांशी संवादातून विद्यार्थ्यांना चांगले काम करण्याची प्रेरणा मिळावी आणि भविष्यात त्यांच्या हातूनही उत्तमोत्तम चित्रकृती घडाव्यात, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली. समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. सह-समन्वयक दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी आभार मानले.

28 FEB 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषेची बंधने तोडून उद्योजक होणे शक्य

## सुहास पालेकर : 'उद्योजकतेला प्रोत्साहन' परिषद


सुहास पालेकर

कोल्हापूर, ता. २७ : 'प्रांत, भाषा यांची बंधने झुगारून यशस्वी उद्योजक होता येते. त्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती आवश्यक असते. कोणत्याही प्रकारच्या व्यवसाय व उद्योजकतेची पार्श्वभूमी नसलेल्या व्यक्तींनी विविध क्षेत्रांतील उद्योग, व्यवसायामध्ये नेत्रदीपक यश मिळविले आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत सुहास पालेकर यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे आयोजित 'उद्योजकतेला प्रोत्साहन आणि सामाजिक समावेशन' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी बीजभाषक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

सुहास पालेकर यांनी आपल्या बीजभाषणामध्ये जगभरातील व देशातील यशस्वी उद्योजक व व्यावसायिक यांची यशोगाथा व त्यांनी त्यासाठी घेतलेली मेहनत आणि वापरलेले कौशल्य व तंत्रज्ञान याची माहिती दिली. आपणही यशस्वी उद्योजक होऊ शकता, असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांत निर्माण केला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यार्थ्यांनीसुद्धा आता मी यशस्वी उद्योजक होणारच हे गृहितक मनाशी बाळगून त्याप्रकारची स्वप्ने बाळगून ते प्रत्यक्षात येण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.' यावेळी डॉ. प्रकाश कांबळे, दीपा इंगवले, केदार मारुलकर, प्रा. भूमित शहा, एस. एस. भोला आदी उपस्थित होते. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

28 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोलंडच्या तरुणाईने लावणी नृत्याविष्काराद्वारे जिंकली मने

## शिवाजी विद्यापीठात संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचा लावणी हा नृत्यप्रकार पाहण्यास जितका सोपा, सादरीकरणास मात्र तितकाच अवघड. त्यातली नजाकत, अदाकारी, ठेका हे सारेच वेगळे. पोलंडच्या युवक, युवतींनी मात्र शिवाजी विद्यापीठाच्या युवा कलाकारांसमवेत लावणी नृत्यात घेतलेला सहभाग पाहून सारेच चकित झाले, आनंदलेही. या सादरीकरणाने त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

पोलंडच्या २१ युवक-युवतींचे शिष्टमंडळाने शिवाजी विद्यापीठास भेट देऊन राष्ट्रीय सेवा योजनेसह विविध अधिविभागांतील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. राजर्षी शाहू




शिवाजी विद्यापीठात लावणी नृत्य सादर करणाऱ्या विद्यार्थिनीसमवेत पोलंडचे युवक-युवती सहभागी झाले.

सभागृहात झालेल्या या कार्यक्रमावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने काही सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यावेळी एक विद्यार्थिनी लावणी नृत्य सादर करीत असताना शिष्टमंडळातील काही कलाकार तिच्या नृत्यात सामील झाले. तिच्याप्रमाणे लावणी करण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला. सहनृत्याविष्काराने त्यांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. यावेळी भारतीय विद्यार्थ्यांशी शिष्टमंडळातील तरुणाईने आत्मियतेने संवाद साधला. पोलंडचे भारताशी भावनिक नाते असून, या दोन्ही देशांत बरेचसे सांस्कृतिक साम्य आहे. दोन्ही देशांमधील राजकीय, सामाजिक संबंध अत्यंत दृढ स्वरूपाचे आहेत. पाहुण्यांप्रतीची आतिथ्यशीलता हेही फार महत्त्वाचे साम्यस्थळ असल्याचे शिष्टमंडळातील युवकांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही शिष्टमंडळातील विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांनी स्वागत केले. सहायक कक्ष अधिकारी कपिल कुमार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रोहित आनंद, भरत चव्हाण उपस्थित होते. पोलंडच्या शिष्टमंडळात हेलेना कॅटरझिना, सँड्रा सॅनियर, पिटर डॅनिकी, मिया स्प्लिट, ओलीविया कोलासा, जाकूब सेरेडेनस्की आदींचा समावेश होता.

28 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर बनतेय 'गॅस चेंबर'

## दहा वर्षांत वाहनांची संख्या वाढली लाखोंनी, रस्ते मात्र तेवढेच



- २०१४ मध्ये होत्या ९ लाख १७ हजार ७५१ दुचाकी व चारचाकी
- शहरातील रस्त्यांवर आज १४ लाख ९९ हजार ६२० वाहने धावताहेत
- हवा प्रदूषित करण्यात वाहनांचा वाटा १२, तर खराब रस्त्यांचा वाटा २२ टक्के
- [illegible]

कोल्हापूर : आशिष शिंदे

कमी जागेत होणारा दिशाहीन विकास कोल्हापूरकरांच्या जीवावर उठला आहे. त्यामुळेच अगदी दशकभरापूर्वी स्वच्छ हवेसाठी ओळखले जाणारे कोल्हापूर आता प्रदूषणाच्या विळख्यात अडकले आहे. गेल्या दहा वर्षांत शहरातील प्रमुख रस्त्यांमध्ये इंचभरही वाढ झालेली नाही. दहा वर्षांपूर्वी ज्या रस्त्यांवर ९ लाख दुचाकी व चारचाकी धावत होत्या, त्याच रस्त्यांवरून आज तब्बल १५ लाख वाहने धावत आहेत. दर्जाहीन रस्ते, वाहनांची बेसुमार वाढ आणि कोपऱ्या-कोपऱ्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे शहरातील प्रमुख मार्ग अक्षरशः 'गॅस चेंबर' बनण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी, कोल्हापूरकरांचा श्वास गुदमरत आहे.

> दहा वर्षांत वाहनसंख्या दुपटीने वाढली असली, तरी शहरातील रस्त्यांची लांबी तेवढीच आहे. परिणामी, कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनाचे प्रमाण चारपट वाढले असून गॅस चेंबरसारखा परिणाम शहरात दिसत आहे. यामुळे तापमानातही वाढ होत आहे. याकडे वेळीच लक्ष देण्याची गरज आहे अन्यथा भविष्यात मोठा धोका उद्भवू शकतो.
>
> - डॉ. पी. डी. राऊत, पर्यावरणतज्ज्ञ

चारचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, रस्त्यांची लांबी, रुंदी आणि स्वरूप यात कोणताही बदल झालेला नाही. उलट रस्त्यांची स्थिती अधिकच बिकट झाली आहे.

दहा वर्षांपूर्वी ज्या रस्त्यांवर ९ लाख १७ हजार ७५१ दुचाकी आणि चारचाकी वाहने धावत होती, त्याच रस्त्यांवरून आज १४ लाख ९९ हजार [illegible]

**पाच वर्षांत ३,२४,०४० वाहनांची नवीन नोंदणी**

| वर्ष | दुचाकी | तीनचाकी | चारचाकी | मोठी वाहने | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | ६८७२८ | ८९० | २६५९ | २३१५ | ३१२ | ७४९०४ |
| २०२० | ६४१८४ | १०६२ | १७३३ | २८०१ | २२९ | ७०००९ |
| २०२१ | ३८२९२ | २४३ | १५३६ | १८९९ | १९० | ४२१६० |
| २०२२ | ४४०४४ | २५५ | १२२६० | ४९८३ | २२३ | ६१७६५ |
| २०२३ | ५६७५६ | १४८ | १४९१३ | ३१८९ | १९६ | ७५२०२ |

अनेकदा इतकी वाहतूक कोंडी होते की, सीपीआर चौक ते मराठा बँक चौक हे अंतर पार करण्यासाठी २० ते २५ मिनिटे लागतात.

**भूस्तरीय ओझोनचा धोका वाढतोय**

वाहतूक कोंडीमुळे वाहनांमधून निघणारा विषाक्त धूर हवेत मिसळतो. त्यामुळे कार्बन मोनोऑक्साईड, पार्टिक्युलेट मॅटर, नायट्रोजन ऑक्साईड आणि भूस्तरीय ओझोन यासारख्या प्रदूषकांचे प्रमाण वाढत आहे. सध्या कोल्हापुरात भूस्तरीय ओझोनचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे.

**हे करण्याची गरज**

वाहतूक नियंत्रण व्यवस्थापनात सुधारणा आणि प्रदूषण नियंत्रणासाठी

शहरात कठोर नियम करण्याची गरज आहे.


जनसंपर्क कक्ष
28 FEB 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रणव, प्रतिक, अनिकेत, मयुरला सुवर्ण

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय शरीरसौष्ठव स्पर्धेत कामगिरी : सहाजण विद्यापीठ संघात

प्रतिनिधी
कोल्हापूर

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या ६५ शरीरसौष्ठवपटूंनी सहभाग घेतला होता. यापैकी ६० किलो गटात प्रतिक मगदूमने (डीकेएएस कॉलेज, इचलकरंजी), ६५ किलो गटात अनिकेत दातेने (एसजीएम कॉलेज, कराड) सुवर्ण पदक पटकावले. तसेच श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या प्रणव कांबळे ७० किलो गटात तर ७५ किलो गटात मयूर जालीने (केडब्लूसी कॉलेज, सांगली) सुवर्ण पदक जिंकले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय शरीरसौष्ठव स्पर्धेतील ७० किलो वजन गटात सुवर्ण पदक मिळवलेला शहाजी कॉलेजचा प्रणव कांबळे (मध्यभागी). सोबत डॉ. प्रशांत पाटील यांच्यासह रौप्य व कांस्य पदक विजेते शरीरसौष्ठवपटू.

याचबरोबर ८० किलो गटात गौरव उबरकरने (मेहता कॉलेज, पाचगणी) तर ८५ किलो गटात सांगलीतील केडब्लूसी कॉलेजच्या ओम पाटीलनेही सुवर्ण पदकावर कब्जा केला. स्पर्धेतील वरील सुवर्ण पदक विजेत्या सहाही शरीरसौष्ठवपटूंची शिवाजी विद्यापीठ संघात निवड करण्यात आली आहे. हा संघ कोचीन (केरळ) येथील संस्कृत विद्यापीठात ७ ते ९ मार्च या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत दाखल करण्यात येणार आहे.

स्पर्धेतील सर्व यशस्वी शरीरसौष्ठवपटूंना चेअरमन मानसिंग बोंद्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. आर. डी. मांडणीकर, जिमखाना प्रमुख डॉ. प्रशांत पाटील, आशियाई पंच रामकृष्ण चितळे व इतर मान्यवरांच्या हस्ते पदके देऊन गौरवण्यात आले.